


दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार २८ जून २०२५ | अंक १९१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# राज्यात पुढील चार दिवस पावसाचा जोर कायम, कोकणात ऑरेंज अलर्ट, मुंबई-पुण्यात काय परिस्थिती?

राज्यात यंदा मान्सून वेळेआधी आला. त्यानंतर जून महिन्याच्या सुरुवातीला पावसाने ब्रेक घेतला होता. परंतु त्यानंतर सर्वत्र पेरणीयोग्य पाऊस झाला. यामुळे राज्यातील अनेक भागांत पेरण्यांना वेग आला आहे. आता जूनच्या शेवटीही पावसाचा जोर कायम असणार आहे. २८ जून ते १ जुलै दरम्यान राज्यातील बहुतांशी भागांत पाऊस पडणार आहे. काही ठिकाणी वादळी वाऱ्यांसह अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

सातार-कोल्हापूरमध्ये ऑरेंज अलर्ट

मध्य महाराष्ट्रात पावसाचा जोर पुढील चार दिवस कायम असणार आहे. पुणे, सातारा, कोल्हापूर, नाशिक भागाच्या पश्चिम भागात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तसेच सातारा आणि



कोल्हापूरच्या घाटमाथ्यावर हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गात 28 जून रोजी मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबारमध्ये पावसाची

विदर्भ आणि मध्य प्रदेशात चांगला पाऊस सुरु आहे. यामुळे हतनूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाण्याची आवक वाढत आहे. जळगावमधील भुसावळच्या हतनूर धरणाचे 8 दरवाजे 50 मीटरने उघडले. धरणातून दहा हजार 171 क्युसेकने पाण्याचा विसर्ग तापी नदी पात्रात होत आहे. पावसामुळे नद्या दुथडी भरून वाहू लागल्याने धरणांत वेगाने आवक सुरू झाली आहे.

शक्यता आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील बहुतांश भागात वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडणार आहे. बीड, परभणी आणि लातूरमध्ये मुसळधार पाऊस पडणार आहे.मुंबई-पुण्यात ब्रेक घेणार?

मुंबईत शनिवारी पावसाने विश्रांती घेतली. परंतु हवामान विभागाने पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. पुणे शहरातही शुक्रवारपासून पावसाने ब्रेक घेतला आहे. शनिवारी ढगाळ वातावरण होते. पुण्यात हलक्या स्वरुपाचा पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे. पुण्याच्या भोर तालुक्यात लावणी योग्य पाऊस झाला. यामुळे तालुक्यातील हिरडस मावाळ खोऱ्यात शेतकऱ्यांची भात लावणीला सुरुवात केली आहे. दमदार पावसाने भात खाचरातून पाणी साचू लागले. यामुळे शेतकऱ्यांची खाचरात चिखलणी करून भात लावणी सुरु केली आहे.

## माजलगाव मठात शेकडो शिवभक्तांनी सोडले सोमवार उद्यापन

माजलगाव-प्रतिनिधी सद्गुरू श्री मिस्किन स्वामी मठ संस्थान येथे शेकडो शिवभक्तांनी सोमवार व्रत उद्यापनाची सांगता केली. यावेळी मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या दिव्य सानिध्यात होमहवन आणि विविध धार्मिक विधी करण्यात आले. दरम्यान, या सोमवार व्रत उद्यापनाला समाजातील सर्व घटकांचा समावेश होता. वीरशैव लिंगायत समाजात सोमवार प्रदोष व्रताला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपल्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी शिवभक्त सोमवार व्रत नित्याने करत असतात. आपली मनोकामना पूर्ण होण्यासाठी शिवभक्त या व्रताचे पालन करतात.



मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली मठात शेकडो शिवभक्त दाम्पत्यांनी या व्रताची सांगता केली. यावेळी होमहवन याच्यासह विविध धार्मिक विधी पार पाडल्या. श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी सोमवार व्रत उद्यापन विषयी आपले आशीवर्चनपर मार्गदर्शन करताना दिव्य संदेश दिला. जीवन संस्कारक्षम करण्यासाठी वीरशैव लिंगायत समाजात सोमवार व्रत उद्यापणाला महत्त्व आहे. एकीकडे स्पर्धेच्या युगात आधुनिकतेला महत्त्व दिले जात असले तरी दुसरीकडे अध्यात्माची जोड देणे क्रमप्राप्त आहे. जीवनात आपण सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी सोमवार व्रत करणे अगत्याचे आहे. श्री संस्थान मठ माजलगाव नेहमीच धार्मिक आणि लोकोपयोगी कार्याला महत्त्व देत आहे. यापुढेही अविरतपणे धार्मिक यज्ञ तेवत राहील, अशी माहिती मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी दिली. दरम्यान, सोमवार दिनांक २३ जून रोजी झालेल्या या सोमवार, प्रदोष, शिवरात्री व्रत उद्यापन कार्यक्रमाला शेकडो शिवभक्तांनी सहभाग नोंदवला. भक्तांचा विविध धार्मिक कार्यक्रमातील सहभाग तेवढाच महत्त्वपूर्ण आहे.

## अरेबियन ज्वेलर्सच्या मालकाचा जामिन फेटाळला



बीड । प्रतिनिधी फ्लॅट, दोन चाकी, चार चाकी वाहन असे आमिष दाखवून लकी ड्रॉ च्या नावाखाली बीडमध्ये सर्वसामान्य नागरिकांना लुटणार्या अरेबियन ज्वेलर्सचा मालक महेबूब मलिक यास लाखोंची फसवणूक केल्या प्रकरणी अटकपुर्व जामीन नामंजूर करण्यात आला आहे. बीडमध्ये अरेबियन ज्वेलर्स या नावाने सोन्याची दुकान आहे व त्यास महबूब मलिक हा नावाचा व्यक्ती चालवतो. त्याने बीड येथे दुकान चालवत असताना सोन्याची व गाडीची लकी ड्रॉ स्कीम चालवली व बीड शहरातील अनेक सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या मोठ्या बक्षिसांचे अमित दाखवून लकी ड्रॉ च्या नावाखाली अरेबियन ज्वेलर्स च्या मालकाने कोट्यावधी रुपये उकळले. व त्यानंतर मागील दोन महिन्यापासून त्याच्या दुकानाचे शटर बंद आहे. शहरातील एक ज्वेलर्स दुकानातून अरेबियन ज्वेलर्स चा मालकाने दिनांक २९. ५. २०२४ रोजी २३ लाख रुपये किमतीचे सोने ग्राहकाला दाखवण्यासाठी नेले याविषयी तक्रारदाराने वारंवार पैसे द्या किंवा सोने परत करा अशी मागणी आरोपीला केली परंतु त्यावेळी त्याने उडवा उडवी चे उत्तरे देऊन फसवणूक केली अशी तक्रार ज्वेलर्स मालकाने(तक्रारदाराने) पोलिसात दिले या प्रकरणी महेबूब मलिक याच्याविरुद्ध कलम ४२०, ४०६ भादवी प्रमाणे शहर पोलीस स्टेशन ला गुन्हा क्र.९३/ २०२५ नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्यात आरोपी अरेबियन ज्वेलर्स चा मालक महबूब मलिक याने मा. सत्र न्यायालय, बीड येथे अटकपूर्व जामीन मिळणे कामे अर्ज दाखल केला होता सदर जामीन अर्जात ड.शेख इमरान खाजा इमरान खाजा यांनी आक्षेप घेत न्यायालयासमोर आरोपीने लाखों रुपयांची सर्वसामान्य लोकांची फसवणूक केलेली असल्याबाबत कागदपत्र दाखल करत माननीय न्यायालयाचे निदर्शनास आणून दिले व आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली या कायदेशीर बाबी ग्राह्य धरून माननीय न्यायालयाने आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर केला. यावेळी आक्षेप अर्जदार यांचे वतीने ॲड .शेख इमरान खाजा यांनी न्यायालयीन बाजू मांडली. त्यांना ॲड.पंकज रायबोळे, ॲड. सूर्यकांत पवार, ॲड. शेख अनवर यांनी सहकार्य केले.

## माणुसकी फाऊंडेशन च्या वतीने अनाथ बेघरांना अन्नदान



आज जिव्हाळा बेघर निवारा केंद्रामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट उपाध्यक्ष तसेच पक्षाचे स्टार प्रचारक, प्रवक्ते महेश भाऊ शिंदे यांनी जिव्हाळा बेघर निवारा केंद्रास सस्नेह भेट दिली.

निवारा केंद्रातील अनाथ बेघर ज्यांना कोणीही नाही अशा सर्वांच्या व्यथा जाणून घेतल्या. माणुसकी फाउंडेशन च्या वतीने जिव्हाळा बेघर निवारकेंद्रास सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या उक्तीप्रमाणे त्यांनी माणुसकी फाउंडेशन जिव्हाळा परिवारासोबत यापुढे सतत कार्य करत राहील त्यांनी अनाथांपैकी दोन अपंगांना लवकरच नवीन सायकल देण्याचे आश्वासन दिले. आणि आज सर्व अनाथ बेघर यांना माणुसकी फाउंडेशन च्या माध्यमातून आज अन्नदान करण्यात आले.

## १६ वर्षापासुन चोपडा पायी दिंडीला पंगत देण्याची भगीरथ धारक यांची परंपरा

कडा । प्रतिनिधी आष्टी तहसिल कार्यालयतील अव्वल कारकुन (शासन) भगीरथ धारक हे गेली १६ वर्षापासून खानदेश जळगाव जिल्ह्यातुन पंढरीला पायी जाणाऱ्या दिंडीला अन्नदान पंगत देतात. काल बुधवर दि.२५ जुन रोजी दुपारची पंगत आष्टी शहरात धारक परिवाराने दिली. दिंडीतील ७० वारकरी व गल्लीतील १०० भावीक उपस्थित होते.आषाढी एकादशीच्या निमित्ताने राज्यातील लाखो वारकरी आपापल्या भागातील दिंड्यामधून पांडु रंगाच्या चरणी लीन होण्यासाठी येतात.चोपडा ते पंढरपूर हा दिंडी सोहळा मार्गस्थ आहे.संतांनी आयुष्यभर सर्वसामान्य माणसाला माणुसकीचा धर्म शिकवला.भक्तीचे महत्त्व सांगून समता,बंधुत्व,ऐक्य आणि सर्वधर्म समभावाची शिकवण दिली आहे असे प्रवचनात तांदळे महाराज म्हणाले.यावेळी स्टेट बँक आफ इंडियाचे शाखाधिकारी राकेश साई,पत्रकार उत्तम बोडखे,दिलीपराव काळे,भगीरथ धारक यांचे भाषणे झाली. यावेळी प्रविण पोकळे,शरद रेडेकर, आण्णासाहेब साबळे,राजेंद्र लाड, बनकर सर आदि मान्यवर उपस्थित होते. श्री भक्त शिरोमणी नामदेव महाराज पंढरपूर यांचे फडावरील पायी दिंडी सोहळाश्री क्षेत्र चोपडा ते श्री क्षेत्र पंढरपूर वै.ह.भ.प.गोविंद महाराज यांचे पदस्पर्शाने पुनीत क्षेत्र चोपडा येथून श्री गुरु केशव महाराज नामदास संत शिरोमणी नामदेव महाराज यांचे वंशज यांच्या कृपाशिर्वादाने पांडुरंग परमात्म्याचे दर्शनासाठी पंढरपूर येथे जाणारा पायी दिंडी सोहळा आहे.शनिवार दि. ७ जुन २०२०५ रोजी सकाळी चोपडा येथून दिंडी निघून १ जुलै रोजी पंढरपूरला पोहचणार आहे.श्री संत श्रावणबाबा विटनेर व वै.मोठे बाबा आळंदी, श्री. केशव महाराज, पंढरपूर,श्री. ह.भ.प.वै.माधव महाराज,महंत सुशिल महाराज, विटनेर,श्री.ह.भ.प.विजय मोहन देवरे,श्री.ह.भ.प.शाम रामचंद्र लोहार , ह.भ.प.सौ.निता देवरे,ह.भ.प.तेजस महाराज उपस्थित होते

## शॉटसर्किट मुळे घराला आग, जिवनआवश्यक वस्तूसह कागदपत्रे जाळून खाक..!



(बीड प्रतिनिधी )दिनांक २६/०७/२०२५ रोजी दुपारी अंकुशनगर भागातील साई पंढरी लॉन्स जवळील घराला सकाळी ११.३० वा. दरम्यान विद्युत शॉट सर्किटमुळे आग लागली.या घरामध्ये पोलिस भरतीचा सराव करणारे विद्यार्थी भाड्याने राहत होते. दुपारी क्लासला गेल्यावर अचानक विद्युत शॉटसर्किटमुळे घरात आग लागली. या आगीत रेवण बंडू फाळके रा. बेलखंडी पा. जाधव अंगद नवनाथ, सुरवसे संतोष महादेव, सुरवसे ज्ञानेश्वर राजेभाऊ सर्व रा. जाधववाडी येथील रहिवासी आहेत.कपडे, बॅगा, महत्त्वाचे कागदपत्रे ( सनद, मार्कसीट, पदवी प्रमाणपत्र, आय टी आय प्रमाणपत्र ) रोख पैसे दहा हजारासह जीवन आवश्यक वस्तू जळुन खाक झाल्या आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले असून, किमान आमचे कागदपत्र शासनाने काढून द्यावेत अशी मागणी त्यांनी केली आहे.

## ममशिवसेना वैद्यकीय मदत कक्ष डॉ.सहर्ष घोलप यांच्या पुढाकारातून वारकऱ्यांच्या सेवेसाठी सक्रिय! एकनाथ आरोग्य सेवा रथामार्फत आरोग्य व चरण सेवा शिबिर

बीड प्रतिनिधी नुकतीच काही दिवसापूर्वी डॉक्टर सहर्ष घोलप यांची शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या राज्य कार्यकारणीवर नियुक्ती करण्यात आली होती. आरोग्य सेवेतील कार्यकाळ व संघटन कौशल्य उत्तम असल्याने त्यांना मोठी जबाबदारी पक्षाकडून देण्यात आली होती. आत्ता आषाढीनिमित्त येणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांच्या सेवेसाठी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष महाराष्ट्र आयोजित वारकऱ्यांसाठी एकनाथ आरोग्यसेवा रथ मार्फत मोफत आरोग्य व चरण सेवा शिबिर सुरू करून जनसेवेचा वसा कायम सुरू आहे. यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब, सातारा पालकमंत्री शंभूराजे देसाई, महाराष्ट्राचे आरोग्यदूत मंगेश चिवटे तसेच युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण, कार्याध्यक्ष रामभाऊ राऊत यांचे वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन मिळत आहे..

शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष महाराष्ट्र राज्याच्या राज्य कार्यकारणीवर काही दिवसापूर्वी डॉक्टर सहर्ष घोलप पाटील यांची निवड करण्यात आली होती. घोलप पाटील यांच्या नसानसामध्ये जनसेवा वाहत आहे. पद मिळताच पुन्हा एकदा सक्रिय काम करण्याला संधी मिळाली आणि त्यांनी शिवसेना वैद्यकीय कक्ष महाराष्ट्र आयोजित वारकऱ्यांसाठी एकनाथ आरोग्यसेवा रथ मार्फत आरोग्य व चरण सेवा शिबिरा मार्फत वारकऱ्यांची सेवा सुरू केली. आणि सामाजिक वसा पुढे घेऊन जात असल्याचं सुद्धा त्यांनी दाखवून दिले आहे. सहकाऱ्यांना सोबत घेऊन वारकऱ्यांची सेवा हे मिळालेलं भाग्यच आहे. असं भाग्य कोणाच्या नशिबात नसतं ते आपल्या नशिबी आलं समजून काम करत राहणं हेच डॉक्टर घोलप यांची आवड पहिल्यापासूनच आहे. ते आवडीने हे कार्य करतात आणि करत राहतील अशीच पांडुरंगा चरणी प्रार्थना देखील वारकऱ्यांकडून होते आहे. हे वापरता वेळी वारकऱ्यांकडून मिळणारे आशीर्वाद हेच पांडुरंगाचे आशीर्वाद समजून कार्य करत असल्याचं डॉक्टर सहर्ष घोलप यांनी सांगितले आहे.



**वारकऱ्यांचे आशीर्वाद म्हणजे पांडुरंगाचे आशीर्वाद – डॉ.सहर्ष घोलप**

शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष महाराष्ट्र आयोजित एकनाथ आरोग्य सेवार्थ मार्फत मोफत आरोग्य व चरण सेवा आम्ही करत आहोत. यामध्ये अनेक अनुभव पाहायला मिळतात. वारकऱ्यांच्या तोंडून निघालेले शब्द हे पांडुरंगाचे शब्द समजून आम्ही ते आशीर्वाद समजून घेतो.. खरोखरच वारकऱ्यांच्या सेवेतून पांडुरंगाची सेवा घडते असाच भास होतो..

– डॉ.सहर्ष घोलप पाटील

शिवसेना वैद्यकीय कक्ष राज्य कार्यकारणी सदस्य.

## संपादकीय

## साऱ्या जगाने सुटकेचा निःश्वास टाकला

अमेरिकेसारख्या महासत्तेच्या सक्रिय सहभागाने इराण–इस्त्रायल युद्धाचा भडका वाढण्याची चिंता व्यक्त होऊ लागली असतानाच अचानक युद्धविरामाची घोषणा झाल्याने साऱ्या जगाने सुटकेचा निःश्वास टाकला आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्षात मध्यस्थीचा दावा करणारे अमेरिकेचे अध्यक्ष आणि स्वयंघोषित शांतिदूत डोनाल्ड ट्रम्प यांनी या युद्धात प्रथम उडी घेतली आणि नंतर इराणच्या प्रत्युत्तरानंतर ते थांबविल्याची घोषणाही केली. युद्धविरामाच्या त्यांच्या घोषणेनंतरही हल्ले सुरूच राहिले; त्यावर त्यांनी इराण व इस्त्रायल यांच्या नावाने आगपाखडही केली. या संघर्षात सध्या तरी शांतता निर्माण झाल्याचे दिसत असले, तरी या बारा दिवसांच्या लढाईतून कोणी काय साध्य केले, हे स्पष्ट झालेले नाही. त्यामुळेच ही अनिर्णित अवस्था किती काळ टिकणार, याबाबत साशंकता आहे. दोन्ही बाजू ंनी क्षेपणास्त्रांचा मारा थांबला असला, तरी त्यांचा वर्षाव पुन्हा सुरू होण्याची चिंता कायम आहे. गाझा पट्टीमध्ये इस्त्रायलचे हल्ले सुरू असतानाच हेजबुल्लाह आणि हुती बंडखोर यांच्याकडून होत असलेल्या प्रतिहल्ल्यांना इराणचे पाठबळ असल्याचे दिसून आल्याने इराण व इस्त्रायलच्या संबंधांमधील कडवटपणा दिवसेंदिवस वाढत होता. त्यात काही दिवसांपूर्वी इराणच्या युरेनियम संवर्धन कार्यक्रमांमुळे आंतरराष्ट्र ीय कराराचे उल्लंघन होत असल्याचा आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संघटनेचा अहवाल समोर आला. लगोलग दुसऱ्या दिवशी इस्त्रायलने ङ्गऑपरेशन रायझिंग लायनफ द्वारे इराणमधील अणुसंशोधन केंद्रे आणि लष्करी तळांवर हल्ले सुरू केले. त्यामध्ये इराणच्या काही वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना लक्ष्य करण्यात आले. इराणनेही तेल अवीवसह इस्त्रायलमधील अन्य शहरांवर क्षेपणास्त्रे डागून त्याला प्रत्युत्तर दिले. याच काळात ट्रम्प हे ङ्गजी ७फ गटाची बैठक सोडू न तातडीने मायदेशी रवाना झाले, तेव्हापासून अमेरिका काय करणार, याकडे साऱ्या जगाचे लक्ष होते. चार दिवसांपूर्वी अमेरिकाही या संघर्षात उतरली आणि इराणच्या तीन अणुसंशोधन कें द्रांवर जोरदार हल्ले चढविण्यात आले. प्रत्युत्तरादाखल इराणने कतारमधील अमेरिकेच्या लष्करी तळाला लक्ष्य केले. अमेरिकेच्या युद्धप्रवेशाने या युद्धाची व्याप्ती किती वाढणार आणि तिसरे महायुद्ध सुरू होणार का, अशा चर्चा जगभरात सुरू झाल्या. मात्र, इराणला नेस्तनाबूत करण्याची भाषा बोलणारे ट्र म्प इराणने केलेले प्रतिहल्ले पाहून शांतिदूताच्या भूमिकेत शिरले आणि इराण इस्त्रायलमध्ये युद्धबंदीची घोषणा केली. ती प्रथम इराणने धुडकावली आणि इस्त्रायलवर हल्ले चढविले; मग इस्त्रायलनेही प्रत्युत्तर दिले. आपल्या घोषणेकडे इस्त्रायल सोयीस्कर दुर्लक्ष करीत असल्याचे पाहून ङ्गशांतिदूतफ ट्रम्प संतापले. त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. अखेर युद्धविराम झाल्यानंतर दोन्ही आघाड्यांवर शांतता असली, तरी या शस्त्रसंधीमागील कारणे आणि या देशांनी काय साध्य केले, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. अण्वस्त्रे बनविण्याची इराणची क्षमता नष्ट केल्याचा दावा अमेरिका आणि इस्त्रायल यांनी केला असला, तरी याबाबत उलटसुलट दावे करण्यात येत आहेत. अर्थात, या घटनाक्रमामुळे इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाला काही काळापुरती तरी खीळ बसली, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. दुसरीकडे इराणच्या संसदेने प्रत्युत्तरादाखल होमु ‍र्झची सामुद्रधुनी बंद करण्याचा निर्णय घेतल्यामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळित होण्याची चिंता साऱ्या जगाला सतावत होती. तेलपुरवठ्याची कोंडी झाल्यास जगभरात तेलाच्या किमती भडकण्याचा धोका होता. दुसरीकडे रशियाने इराणला पाठिंबा देऊन मदतीची तयारीही दर्शवली होती, तसेच गेल्या काही काळातील चीन व इराण यांच्यातील वाढती जवळीक पाहता चीनची भूमिकाही कळीची ठरण्याची शक्यता होती. आपला सर्वांत मोठा तेल पुरवठादार, व्यापारातील मोठा भागीदार आणि आंतरखंडीय रेल्वे प्रकल्पातील सहकारी असलेल्या इराणसाठी धावून येणे चीनच्या उद्दिष्टांशी सुसंगत होते. अशी अनेक धोके प्रसवणारी अस्थिरता कोणालाच परवडणारी नाही. ट्रम्प यांच्या आक्रमक भूमिकेबाबत अमेरिकेत आणि बेंजामिन नेतान्याहू यांच्या युद्धखोर भूमिकेबाबत इस्त्रायली नागरिकांमध्येही विरोधाचा सूर उमटतो आहे.

# स्व. मुरलीधर विठ्ठल मोरे यांच्या पुण्यस्मरणार्थ पहिली ते सातवी च्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक घेणार दत्तक - ॲड. गणेश मोरे




### स्व. मुरलीधर मोरे यांना राजकारणाची सुद्धा आवड होती.


स्व. मुरलीधर विठ्ठल मोरे यांना राजकारणाची आवड होती. मुरलीधर विठ्ठल मोरे हे १५ वर्ष वडगाव सेवासहकारी सोसायटी चे बिनविरोध चेअरमन होते. ते हयात असताना त्यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड. गणेश मोरे यांनी वडगाव ग्रामपंचायत निवडणूक लढवली आणि परिसरात कमी वयाचा सरपंच म्हणून जनतेतून ॲड. गणेश मोरे हे निवडून आले होते. आणि आता ॲड. गणेश मोरे यांच्या मातोश्री सुशाला आसाराम मोरे या वडगाव कळसंबर येथील विद्यमान सरपंच म्हणून कार्यरत आहेत. एका नवा आदर्श निर्माण करण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक दत्तक घेण्याचे ठरवले आहे.

बीड प्रतिनिधी – बीड तालुक्यातील वडगाव कळसंबर येथील भूमिपुत्र आणि बीड बालाघाटावरील पहिले एस. टी आय अधिकारी स्व. मुरलीधर विठ्ठल मोरे यांच्या पाहिले पुण्यस्मरणार्थ वडगाव कळसंबर चे सरपंच सुशाला आसाराम मोरे यांनी तसेच मोरे कुटुंबियांनी पहिली ते सातवी च्या जिल्हा परिषद शाळा वडगाव (क)च्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षिणक दत्तक घेणार असल्याचे ॲड. गणेश मोरे यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे म्हटले आहे.

स्व. मुरलीधर विठ्ठल मोरे यांना सामाजिक कार्याची सतत आवड होती. ते बालाघाटावरील पाहिले एस टी आय अधिकारी होते. औरंगाबाद विद्यापीठात स्व. मुरलीधर विठ्ठल मोरे हे एम. ए. पोल्टिकल सायन्स गोल्ड मेडलिस्ट होते. तसेच तत्कालीन एम . पी एस सी परीक्षेत ते महाराष्ट्रात पहिले आले होते. मुरलीधर विठ्ठल मोरे बालाघाटावरील पहिले सुपर क्लास वन अधिकारी होते. त्यांच्या कार्यकिर्तीमध्ये त्यांना राज्य शासनाकडून उत्कृष्ट कार्यकेल्या बद्दल पुरस्कार देण्यात आलेला होता. त्या काळात स्व. मुरलीधर विठ्ठल मोरे राज्यामध्ये पहिले आले असल्याने त्यांचा अनेक विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा या करिता हा संकल्प ॲड गणेश मोरे यांनी राबवण्याचे ठरवले आहे. त्यांनी अनेक वेगवेगळ्या ठिकाणी सेल टॅक्स ऑफिसर म्हणून अतिशय चांगल्या प्रकारे आपले कर्तव्य बजावले होते. स्व. मुरलीधर विठ्ठल मोरे यांचे मागील वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचा पुतण्या सामाजिक आणि शैक्षणिक कामात अग्रेसर आहेत. आपल्या चुलत्यांचा आदर्श घेत ॲड. गणेश मोरे यांनी पहिली ते सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षिणक दत्तक घेण्याचे ठरवले आहे.

# राज्यस्तरीय नियोजन बैठकीला नांदेडवरून हजारो मराठे जाणार- सकल मराठा समाज नांदेड

नांदेड प्रतिनिधी : नांदेड : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी चलो मुंबई ची हाक देणारे मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या माध्यमातून २९ जून रोजी अंतरवाली सराटी येथे राज्यस्तरीय नियोजन बैठकीचे आयोजन केले आहे, करिता सदरील बैठकीला नांदेड येथून हजारो मराठे जाणार असल्याचा दृढ निश्चय आजच्या बैठकीत सकल मराठा समाजाकडून करण्यात आला आहे. जरांगे पाटील यांनी चलो मुंबई ची हाक दिली असुन येत्या 29 ऑगस्ट 2025 रोजी पुन्हा करोडो मराठे खालील मागण्यासाठी मुंबई जाण्यासाठी प्रचंड ताकतीने तयारीला लागले आहेत,त्या तयारीसाठी राज्यभरातील गावागावात तालुक्यात आणि जिल्ह्यात सुद्धा बैठका जोरात चालु झाल्या आहेत आणि त्यात सुद्धा जरांगे पाटील यांनी एक राज्यस्तरीय निर्णायक बैठक 29 जुन रोजी अंतरवाली सराटी येथे बोलावली असुन त्याच अनुषंगाने, सकल मराठा समाज नांदेडच्या वतीने आज नांदेड शहरातील हनुमान मंदिर मंगल कार्यालय येथे प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक पार पडली व 29 जुन च्या राज्यस्तरीय बैठकीला नांदेड वरून हजारो समाज बांधव जाण्याचे नियोजन करण्यात आले. यावेळी मुदखेड, कंधार, लोहा, नायगाव, बिलोली, हदगांव, उमरी, भोकर यासह नांदेड दक्षिण व उत्तर तालुक्यातील मराठा सेवक बैठकीला उपस्थित होते, सर्वांनी मिळून समाजातील तळागाळातील समाज बांधवापर्यंत जरांगे पाटील यांचा विचार रुजवून समाजाला नवचेतना देण्याचे काम करू व मुंबई कुच करण्यासाठी लाखों मराठा बांधवाना आपल्या हक्काच्या आरक्षणाची जाणीव करून देत या सरकारसोबत दंड थोपटण्यासाठी तयार करू असा निश्चय केला व खालील मागण्यासाठी नांदेड जिल्हा हा कायम जरांगे पाटलासोबत असेल असा विश्वास सुद्धा यावेळी व्यक्त केला. प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे आहेत:



1 मराठा आणि कुणबी एकच असल्याचा अध्यादेश तात्काळ लागू करावा.
2 हैद्राबाद, सातारा, व बॉम्बे गॅझेटियर लागू करून त्यावर अंमलबजावणी करावी.
3 “सगे-सोयरे” अधिसूचनेची तात्काळ अंमलबजावणी करावी.
4 मराठा आरक्षणातील आंदोलकांवरील दाखल गुन्हे मागे घ्यावेत.
5 मराठा आंदोलनातील बलिदान दिलेल्या कुटुंबांना नोकरी व आर्थिक मदत द्यावी.
6मा.न्या. शिंदे समितीला मुदतवाढ द्यावी.
7 संतोष अण्णा देशमुख हत्या आणि कोपर्डी प्रकरणातील आरोपींना फाशी देण्यात यावी.

जर हे निर्णय १ ऑगस्ट २०२५ पर्यंत घेण्यात आले नाहीत, तर २९ ऑगस्ट २०२५ रोजी मोठ्या प्रमाणात मुंबईत आंदोलन करण्याचा स्पष्ट इशारा जरांगे पाटील यांच्या माध्यमातून सरकारला देण्यात आला आहे व सदरील आंदोलनाला सकल मराठा समाज, नांदेड जिल्ह्याच्या वतीने जाहीर पाठिंबा देत नांदेड वरून लाखों मराठा समाज या आंदोलनात सहभागी होईल व जो पर्यंत मागण्या मान्य होणार नाहीत तोपर्यंत मुंबई सोडणार नाहीत असा खमखमित ईशारा सकल मराठा समाजाच्या वतीने यावेळी देण्यात आला.

सदरील बैठकीला असंख्य मराठा सेवक उपस्थित होते.

# २९–जून रोजी प्रा.गंगाधर बनबरे यांचे व्याख्यान

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : शिव शाहू फुले आंबेडकर अण्णाभाऊ विचारमंच किनवट द्वारा आयोजित राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ दिनांक २९– जून रोजी सकाळी १०:३० वाजता एन के गार्डन येथे आयोजित करण्यात आला आहे. या सत्कार समारंभाप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी इतिहासाचे गाढे अभ्यासक प्रसिद्ध ख्यातनाम लेखक व्याख्याते तथा संभाजी ब्रिगेडचे प्रदेश प्रवक्ते प्रा.गंगाधर बनबरे तसेच मा.निजामुद्दीन शेख सचिव सेवा फाउंडेशन यांचे जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.अशोक बेलखोडे तर उद्घाटक म्हणून मा.इसा खान माजी नगराध्यक्ष हे उपस्थित राहणार आहेत.या आयोजित व्याख्यानास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिव शाहू फुले आंबेडकर अण्णाभाऊ विचार मंच किनवट यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# सेवानिवृत्त शिक्षकांऐवजी बेरोजगारांना संधी द्या–संभाजी ब्रिगेड

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : सेवानिवृत्त शिक्षक यांना मानधनावर शिक्षण प्रक्रियेत नेमणूक न देता बेरोजगार तरुणांना संधी देण्यात यावी यासाठी संभाजी ब्रिगेड च्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांच्या मार्फत शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांना निवेदन पाठविण्यात आले

स्थानिक परिसरात डीएड,बीएड पदविधर व पदविधारक सुशिक्षित बेरोजगार युवक युवती मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.शासनाने सुशिक्षित बेरोजगार युवक युवतींना यामध्ये सामावून घेत त्यांच्या नेमणुकी करत बेरोजगारांचा प्रश्न सोडविणे जास्त महत्वाचे आहे.पेन्शन धारकांना ही नेमणूक देणे योग्य नाही.

जिल्हा परिषद शाळा, मनपा शाळा, नगर पालिका शाळा, या शाळांमध्ये सेवा निवृत्त शिक्षक भरती करून ग्रामीण भागातील शिकलेल्या मुलांच्या पिढीचे जाणीवपूर्वक नुकसान करीत आहात का? असा प्रश्न निर्माण होतो. अनेक तरुण बेरोजगार होऊन आत्महत्या करत आहेत. शासन प्राथमिक खाजगी शाळा, माध्यमिक खाजगी शाळा अनुदानित शाळामधून सेवानिवृत्त शिक्षक यांची मानधना वर नेमणूक करीत नाही. मग हा दुजाभाव नेमका कशासाठी ? फक्त ग्रामीण भागातील सरकारी शाळा मधूनच नेमणूक करण्याचा आदेश का? असे प्रश्न निर्माण होत आहेत. यामुळे ग्रामीण भागात असंतोषाचे वातावरण निर्माण होत आहे. याचा शिक्षणावर परिणाम होत आहे.

डी एड, बी एड झालेले सुशिक्षित बेकार तरुण खूप आहेत.त्यांना तसेच बेकार ठेवून, पेन्शन धारक यांना नेमून तरुणांचे खच्चीकरण करण्यासारखे आहे.म्हणून संभाजी ब्रिगेडची मागणी आहे कोणत्या ही शाळेवर सेवानिवृत्त शिक्षक यांना मानधनावर नेमणूक देऊ नये.



# जपानहून धर्मगुरुंची उपस्थिती; खुलताबादमध्ये 10 दिवसीय बौद्ध शिबिर



प्रतिनिधी, खुलताबाद खुलताबाद (छ.सं.) – बौद्ध धर्मातील महत्त्वपूर्ण वर्षावास कालावधीच्या पार्श्वभूमीवर तालुका खुलताबाद येथील बुद्धभूमी मावसाळा येथे १० दिवसीय श्रामणेर व श्रामणेरी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १० जुलै ते २१ जुलै २०२५ दरम्यान होणाऱ्या या शिबिरात जपानहून जागतिक कीर्तीचे बौद्ध धर्मगुरू उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या विशेष शिबिरामध्ये महाराष्ट्रातील नामवंत भिक्खू, बौद्ध विचारवंत यांचेदेखील सखोल मार्गदर्शन लाभणार आहे. शिबिराच्या निमित्ताने त्रिशरण, पंचशील, अष्टशील, उपोसथशील, तसेच चार आर्यसत्य, अष्टांगिक मार्ग, दहापारमिता, बावीस प्रतिज्ञा, बाराही पौर्णिमा यासारख्या बौद्ध सिद्धांतांचा अभ्यास होणार आहे. शिबिरात भिक्खूनी जीवनशैली, ध्यानधारणा, महापुरुषांच्या जीवनकार्यावर प्रवचने, तसेच बौद्ध पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात येणार असून, हे शिबिर बौद्ध धम्मप्रसारासाठी एक महत्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. शिबिरात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी किंवा अन्नदान, बस्तुदान, आर्थिक मदत किंवा धान्य स्वरूपात योगदान देऊ इच्छिणाऱ्यांनी मुख्य आयोजिका आर्याजी अभिधम्मा (मो. ९१७५४५८९१२) यांच्याशी तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन संस्थापक अध्यक्ष भदन्त एस. प्रज्ञाबोधी महाथेरो, भदन्त सागरबोधी, भदन्त करुणाबोधी, संगिता जाधव, धम्मपाल प्रधान यांनी केले आहे. बौद्ध अनुयायांसाठी हा एक संपूर्ण साधना, शिक्षण आणि मार्गदर्शनाचा पर्व ठरणार असून, सर्व बौद्ध बांधवांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांचं सानुग्रह अनुदान हडप करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करा- प्रदीप शिंदे



प्रतिनिधी अंबड जालना जिल्ह्यात अतिवृष्टी पूर व गारपीटीमुळे जालना जिल्ह्यात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते त्या शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून सानुग्रह अनुदान मंजूर झाले त्या अनुदानापैकी 50 कोटी रुपये काही तलाठी ग्रामसेवक कृषी सहाय्यक व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सानुग्रह अनुदान हडप केल्याचे सिद्ध झाले आहे त्यामध्ये फक्त अंबड घनसावंगी तालुक्यामध्ये चाळीस कोटी रुपये हडप केल्या गेल्या आहे माननीय जिल्हाधिकारी साहेबांनी त्या पैकी काही घोटाळेबाज कर्मचाऱ्यांना केवळ निलंबित केले आहेत अजून बाकीचे तसेच मोकाट आहेत त्यांचे नावे देखील अजून प्रसिद्ध करण्यात आलेली नाहीत त्यांचे नावे व त्यांनी केलेल्या घोटाळ्याच्या रकमा लवकरात लवकर प्रसिद्ध कराव्यात व निलंबित केलेल्या कर्मचाऱ्यासह राहिलेल्या सर्वच कर्मचाऱ्यांना निलंबन करण्याऐवजी तात्काळ सेवेतून बडतर्फ करण्यात यावे व सर्व संबंधित गोरगरीब शेतकऱ्यांना त्यांचं मंजूर झालेलं समुग्रह अनुदान त्वरित वाटप करावे याकरिता प्रहार संघटनेच्या वतीने आज जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले एक जुलै पर्यंत संबंधित कर्मचाऱ्यांना सेवेतून बड तर्फ करावी अन्यथा दोन जुलै रोजी आपल्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सनई डफडे बजाव आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला प्रसंगी प्रदीप शिंदे सावळा हरी शिंदे जगन्नाथ ठाकूर लखन शिंदे आधी कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिक्षण विस्तार अधिकारीपदी नियुक्ती... सौ. संगीताताई ढोटे यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार



प्रतिनिधी | पिंपळखुटा पिंपळखुटा गावासाठी गौरवाची बाब ठरली आहे. येथील जेष्ठ स्व. पुंजाजी पां. ढोटे यांच्या सूनबाई व ह.भ.प. विनोदराव ढोटे सर यांच्या पत्नी सौ. संगीताताई विनोदराव ढोटे (भिंगारे) यांची शिक्षण विस्तार अधिकारी पदावर मंगरूळपीर येथे नियुक्ती झाल्याबद्दल गावकऱ्यांतून आनंदाची लाट पसरली आहे. या यशस्वी नियुक्तीनिमित्त गावातील विविध स्तरातील नागरिकांच्या वतीने सौ. संगीताताई यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी यशवंत ढोटे, रोहन ढोटे, विजय दानापुरे, तसेच संतोष महाराज ढोटे यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती. गावकऱ्यांनी दिलेल्या या सन्मानाबद्दल संगीताताईंनी सर्वांचे आभार मानत पुढील वाटचालीतही सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

# तृतीयपंथीयांसोबत वृक्षारोपण करून सुवर्णा सुतार यांचा वाढदिवस साजरा

बीड । प्रतिनिधी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नेताजी वस्ती केंद्र खांडे पारगांव ता. जि.बीड येथे कार्यरत असलेल्या आदर्श शिक्षिका सुवर्णा सुतार यांनी बीड येथील विजयकुमार खंडोजी इंगळे संस्थापक अध्यक्ष असलेल्या जय शिवराय बहूउद्देशीय सेवाभावी संस्था गोर्लेगाव संचलित ध्येयपूर्ती निवासी शैक्षणिक प्रकल्प याठिकाणी आपला वाढदिवस समाजाची बांधिलकी राखून बीड येथील तृतीयपंथी सपना व बाळू, मुस्कान, देविका व इतरांसोबत त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करुन आगळ्यावेगळ्या पध्दतीने साजरा केला. बीड मधील तृतीयपंथी



लोकांच्या समस्या काय असतात, त्या कशा सोडवता येतील याबाबत विचार करुन समाजापासून दूर असणाऱ्या या लोकांना माणसात आणून त्यांना मानसन्मान कसा देता येईल याबद्दल यावेळी विविध मान्यवरांनी आपले विचार मांडले. सौ. सुवर्णा सुतार यांनी तृतीयपंथीयांसोबत वाढदिवस साजरा करुन समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. वाढदिवसावर व्यर्थ खर्च करण्यापेक्षा वाढदिवसानिमित्त झाडे लावून वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेतला. यावर्षी पर्यावरणाचा व तृतीयपंथी लोकांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच जिल्हा परिषद शाळा नेताजीवस्ती येथे देखील वृक्षारोपण व मुलांना विविध शैक्षणिक साहित्य वाटप केले. तसेच उपस्थित मान्यवरांना झाडांची रोपे देवून झाडे लावा झाडे जगवा असा पर्यावरण विषयक संदेश दिला. यावेळी उपस्थित असणाऱ्या सर्वांचे त्यांनी आभार मानले. याप्रसंगी सतिश वराट, ज्ञानेश्वर कोठूळे, पंढरीनाथ नवले, श्रीकांत देशमुख, सचिन पिसाळ, विलास दुधाळ, संजय ठाकूर, गणेश जाधव, यशवंत जानवळे, दत्ता बनकर, विजय इंगळे, पांडुरंग काजगुंडे, अरुण उनवणे, वैभव धावडे, धडाडीच्या सामाजिक कार्यकर्त्या तथा लेखिका रुपाली देशपांडे, सुरेखा कागदे, वर्षा थिटे, जया सुरवसे, ट्रान्स जेंडर सपना बाळू, मुस्कान, देवीका आदींची उपस्थिती होती.

# जावेद भैय्या कुरैशींचा सामाजिक क्रांतीचा झंझावात: एकता युवा मंच महाराष्ट्रात घडवतोय सामाजिक क्रांती!

गेवराई प्रतिनिधी: – महाराष्ट्रात सामाजिक कार्याचा एक नवा अध्याय लिहिणारी एकता युवा मंच, महाराष्ट्र राज्य ही संघटना आज प्रत्येकाच्या मनात स्थान निर्माण करत आहे. या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष जावेद भैय्या कुरैशी यांनी जात, धर्म, पंथ यांच्या पलीकडे जाऊन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एक अनोखा विडा उचलला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली ही संघटना गरीब, गरजू आणि वंचितांसाठी आधारस्तंभ बनली आहे. ङ्गजिथे तुम्ही कमी, तिथे आम्हीङ्क या ब्रीदवाक्यासह एकता युवा मंच समाजसेवेच्या प्रत्येक क्षेत्रात आपली छाप पाडत आहे.जावेद भैय्या कुरैशी यांनी सामाजिक कार्याची सुरुवात गरीब कुटुंबांना आधार देण्यापासून केली. मग ती गरजूंच्या मुलींची लग्ने लावून देणे असो, गंभीर आजारांनी त्रस्त रुग्णांना आर्थिक आणि वैद्यकीय मदत पुरवणे असो, किंवा रक्तदान शिबिरे आयोजित करणे असो, त्यांनी प्रत्येक क्षेत्रात आपली जबाबदारी नेटाने पार पाडली.



पर्यावरण संतुलनासाठी झाडे लावण्यापासून ते समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याची प्रेरणा देण्यापर्यंत, त्यांचे कार्य सर्वसमावेशक आहे. बीड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात त्यांच्या या कार्यामुळे लोक स्वतः हून या चळवळीशी जोडले जात आहेत.
जावेद भैय्या कुरैशी यांनी आता मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी विशेष पुढाकार घेतला आहे. ओबीसी प्रवर्गातील लोकांना ओबीसी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी आणि खुल्या प्रवर्गातील ईडब्ल्यूएस (आर्थिकदृष्ट्या मागास) घटकांना प्रमाणपत्र मिळवण्यासाठी जनजागृती मोहीम राबवली जाणार आहे. शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन, दर्जेदार शिक्षण कसे मिळेल यासाठी ते अथक प्रयत्न करत आहेत. ङ्गशिक्षण हाच खरा पाया आहे, जो समाजाला पुढे घेऊन जाईल,ङ्क असे त्यांचे ठाम मत आहे.याशिवाय, एकता युवा मंच आता नव्या दिशेने वाटचाल करत आहे. संघटनेने राज्य, जिल्हा आणि तालुका स्तरावर कार्यकारिणी गठीत करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे कार्याची व्याप्ती वाढणार असून, अधिकाधिक लोकांपर्यंत मदत पोहोचेल. जावेद भैय्या कुरैशी यांनी ठणकावून सांगितले, ङ्गमी आणि माझी संघटना २४ तास जनतेच्या सेवेसाठी तत्पर आहे. कोणाचेही काम प्रामाणिकपणे आणि तत्परतेने करणे हाच आमचा धर्म आहे.ङ्क एकता युवा मंचने केवळ वैद्यकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे, तर आपत्ती व्यवस्थापनातही मोलाची भूमिका बजावली आहे. दुष्काळ किंवा अन्य संकटांमध्ये गरजूंना अन्न, कपडे आणि निवारा पुरवण्याचे काम त्यांनी केले आहे. तसेच, महिलांच्या सक्षमीकरणासाठी कौशल्य विकास आणि युवकांसाठी रोजगार संधी निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन करण्याचे अमूल्य कार्य त्यांनी केले आहे. पर्यावरण संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण आणि स्वच्छता अभियान राबवले जात आहे.जावेद भैय्या कुरैशी यांचा हा प्रवास खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्यामुळे एकता युवा मंच केवळ एक संघटना न राहता, समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या आशेचा किरण बनला आहे. ङ्गसेवा हीच खरी ईश्वरभक्तीङ्क या तत्त्वावर चालणारी ही चळवळ महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सामाजिक क्रांती घडवत आहे.

# अंमलीपदार्थ सेवन विरोधी दिनानिमित्त जनजागृती शिबीर

बीड । प्रतिनिधी न्या. आनंद एल.यावलकर, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधीसेवा प्राधिकरण बीडच्या वतीने मध्ये अंमली पदार्थ सेवन विरोधी दिनानिमित्त जनजागृती शिबीराचे आयोजन दिनांक २६/०६/ २०२५ रोजी सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालय, बीड येथे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीस राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली. सदर कार्यक्रमासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड सचिव श्रीमती. रेणुका एम. सातव, प्राचार्य डॉ. महेंद्र गोशाल, डॉ.मुजाहिद ईस्माइल मनोरागतज्ञ जिल्हा शासकीय रूग्णालय बीड, अधिकारमित्र तत्वशिल कांबळे, अशोक तांगडे अध्यक्ष बालकल्याण समिती बीड, मिथुन जोगदंड, शामसु ंदर शिंदे अधिक्षक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड, ओंकार नाईकवाडे, रोहन दिवे हे उपस्थित होते. या शिबीरात महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी आदी हे बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. महेंद्र गोशाल यांनी केले. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड सचिव श्रीमती. सातव मॅडम म्हणाल्या यांनी अंमली पदार्थ विरोधी जागरूकता आणि नशामुक्ती दिशादर्शक अंमली पदार्थ भारत योजना २०२५ (ऊ थछ), समितीची स्थापना व स्किम विषयी मार्गदर्शन केले, यासह शासकीय कार्यलयातील महिला वरील लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा (झजडक –उढ २०१३) याबाबत मार्गदर्शन केले महिलांचे हक्क व अधिकार याविशयी मार्गदर्शन केले. डॉ.मुजाहिद मोहम्मद यांनी व्यसनाचे दुष्परिणाम सांगितले व ते व्यसन कमी कसे करावे व उडवावे यावर मार्गदर्शन केले. अशोक तांगडे हे मनोगत व्यक्त करताना म्हणाले

# बहुजन हिताय बहुजन सुखाय असा राज्यकारभार करणारे रयतेचे राजे छत्रपती शाहू महाराज सदा सर्वकाळ वंदनीय आहेत–संतोष डोंगरे

बीड । प्रतिनिधी बहुजनांचा उद्धार शिक्षणाशिवाय होणार नाही हे विद्या विना मती गेली म हे क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांच्या थोर विचारांची आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करणारे व बहुजन हिताय बहुजन सुखाय या मूलमंत्र्यानुसार राज्यकारभार करणारे रयतेचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज सदा सर्वकाळ वंदनीय आहेत असे उद्गार सुप्रसिद्ध कीर्तनकार व संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे गाढे अभ्यासक प्रमुख वक्ते श्री संतोष डोंगरे सर यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना संबोधितांना प्रतिपादन केले. धम्मदीप बुद्ध विहार बीड येथे बुद्ध विहार कमिटी, वाचाल तर वाचाल वाचनालयातर्फे छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विनम्र अभिवादन कार्यक्रम प्रसंगी अध्यक्ष म्हणून महामानव अभिवादन



ग्रुपचे अध्यक्ष जीएम भोले सर हे होते तर ह. भ. प. श्रीकृष्ण उबाळे सर प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. या कार्यक्रमास वाचाल तर वाचालचे संस्थापक अध्यक्ष डी जी वानखेडे, समता सैनिक दलाचे मेजर कॅप्टन राजाभाऊ आठवले, आयु. बि जी दळवी, डीएम राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती, सर्वप्रथम तथागत, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती राजश्री शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प व पुष्पमाला मान्यवरांच्या हस्ते अर्पण करून विनम्र

# बळीराजा तुझ्या हाकेला ओ द्यायला सदैव मी तयार : तहसीलदार शेळके

## कार्यालयात बसून नव्हे तर सर्व टीम रानात येऊन रस्त्याच्या अडचणी सोडविणारे तहसीलदार म्हणजे चंद्रकांत शेळके

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्या अधिपत्याखाली नेहमीच मदतीला धावून येणारे तहसीलदार

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे जिल्हाभरात विविध तालुक्यांना भेटी देत आहेत . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक हे सुद्धा विमुक्त भटके बांधव असतील अथवा इतर नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी सदैव तयार असतात .

त्याचप्रमाणे बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके आणि त्यांची संपूर्ण टीम रस्त्याची कामे असो अथवा पंचनामे असो यासाठी सदैव शेतात , रानावनात फिरत असते .

असाच एक रस्ता सरस्वती शाळा ते आहेर धानोरा ते वरवटी . आहेर धानोरा तसे बीड शहरालगतच असलेले गाव . तथापि शालेय विद्यार्थ्यांना , गावकऱ्यांना धड रस्ता नाही अशी गत . शासनाच्या महाराजस्व योजनेत , सस्ती अदालत योजनेंतर्गत पांदण रस्ता , शिव रस्ता मोकळा करणे , अतिक्रमण विरहित करणे इत्यादी मोहिमा राबविण्यात येत आहेत . शहरातील खातेदार शेतकरी व दोन्ही गावचे शेतकरी यांचेशी चर्चा करुन तहसीलदार शेळके यांनी शुक्रवारी हा रस्ता मोकळा केला . रस्त्यातील लहान झाडे झूडपे काढल्याने रस्त्याने मोकळा श्वास घेतला . खुणा व हद्दी निश्चित करून रीतसर मोजणी करून रस्ता पूर्ण होणार आहे . हा रस्ता ग्रामीण मार्ग असून जिल्हा परिषद बांधकाम विभाग , उपअधीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून हद्दी खुणा करून नियमानुसार रस्ता रुंदीकरण करून घ्यावे अशा सुचना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सर्व शेतकरी बांधव यांना दिल्या . किरकोळ असलेले अतिक्रमण काढल्यामुळे रस्ता मोकळा होऊन गावातील दुध विक्रेते , शाळेतील विद्यार्थी , आजारी रुग्ण , शेती वहिवाट करणारे शेतकरी ,



असे सर्व जण यांची सोय झाली आहे .

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनानुसार तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी प्रत्यक्ष येऊन हा रस्ता काढून दिला . यावेळी समवेत मंडळ अधिकारी बीड अनिल तांदळे , तलाठी सचिन एरंडे , शब्बीर पठाण , शशांक कुलकर्णी हे होते . आहेर धानोरा गावचे सरपंच बाळासाहेब इंगोले , अमोल इंगोले , बाबुराव पिंगळे , आनंद पिंगळे , दत्ता आदमाने , संदीप आदमाने सर्व बीड उपस्थित होते .

शुक्रवारी असाच एक ढेकनमोह ते पिंपळनेर एक वर्षांपासून अडवलेला रस्ता सस्ती अदालत अंतर्गत मंडळ अधिकारी पुरुषोत्तम आंधळे यांनी समोपचाराने खुला केला . अंदाजे एक किलोमीटर लांबीचा , ५ ते ७ फूट रुंदीचा रस्ता हा ३.५ मीटर रुंद करून खुला करण्यात आला . यावेळी गावाकऱ्यांनी प्रशासनाचे आभार मानले . यावेळी पी.एस.आंधळे , मंडळ अधिकारी नाळवंडी , जे.जी.शेख ग्राम महसुल अधिकारी ढेकणमोहा , शिवाजी गाडीवान सरपंच , सतिश देवकते ग्रा.प.सदस्य , संतोष जाधव ग्रा.प.सदस्य , कैलास देवकते तंटामुक्ती अध्यक्ष , सर्जेराव जाधव , सखाराम जाधव , भगवान थापडे , जगन्नाथ थापडे , भागवत थापडे , सुभाष भिताडे , जालिंदर भिताडे , राजेंद्र भिताडे , गोविंद जाधव , शिवाजी जाधव , जोतिराम जाधव , मुकेश पिंगळे , रमेश गलांडे , गणेश गलांडे , बळीराम थापडे , कृष्णा पिंगळे , मनोहर देवकते , बाबु जाधव , मिलिंद शिंदे , चञभुज थापडे , विश्वनाथ भिताडे , श्रीराम थापडे , दिनेश पिसाळ , दिनकर येवले , अनंत करांडे ग्रा.प.सदस्य , कैलास थापडे , विलास थापडे इ.शेतकरी उपस्थित होते .

बीड तालुक्यात इतक्या मोठ्या प्रमाणात शेत रस्ते , बंद रस्ते मोकळे होण्याची ही किंबहुना पहिलीच वेळ असावी . दोन दिवसांपूर्वी मूळुक मसेवाडी येथील शेतकऱ्यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे अभिनंदन करत आभार मानले . असे तहसीलदार मिळाले तर तालुक्यातील जनतेचे प्रश्न तात्काळ सुटण्यास मदत होईल , असे मत शेतकरी व्यक्त करीत आहेत

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

शनिवार २८ जून २०२५
https://lokaarambh.com



# संघ म्हणजे नेमकं काय? मोहन भागवत यांनी एका वाक्यात अर्थ सांगितला



संघ म्हणजे काय? संघाचा अर्थ काय यावर स्पष्टीकरण देताना सरसंघचालक मोहन भागवत यांनी मोठं विधान केलं आहे. संघ म्हणजे काय? तर संघ म्हणजे आपलेपणा एवढे सरळ साधं संघाचे वर्णन आहे, संघ करतो काय तर हिंदूंचं संघटन, आपण एकाच तत्वाचे आहोत म्हणजे आपले आहोत, असं मोहन भागवत यांनी म्हटलं आहे. ते पुण्यामध्ये बोलत होते. नेमकं काय म्हणाले भागवत? मनुष्याला बुद्धी दिलेली आहे, तो विचार करतो आणि त्याच्यामुळे तो आहे त्याच्यापेक्षाही चांगला होऊ शकतो. बुद्धी उलटी चालवली तर आहे त्याच्यापेक्षा वाईटही होऊ शकतो, तो वाईट होत नाही याचं कारण त्याला आपलेपणा जाणवतो. संघ काय काम करतो? समाजाला आपलेपणाचा विसर पडत चाललेला आहे, त्याची आठवण संघ करून देतो, असं मोहन भागवत यांनी म्हटलं आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, स्वामी सेवकाचं काम काय शक्यतो संस्कार बंद करायचे आणि आपल्या संपर्कात येणाऱ्याची निस्वार्थ बुद्धीने सेवा करायची आणि सेवा सर्व शक्तीनिशी करायची, आजकाल मधून -मधून लोक इंग्रजीत बोलतात, लोकांना इंग्रजीत बोलायची जास्त सवय आहे, इंग्रजीत बोललं म्हणजे काहीतरी पहिल्यांदाच सांगतो आहे, असं वाटतं. म्हणून गिव्हिंग बॅक असा शब्दप्रयोग करतात, गिव्हिंग बॅक हे इंग्रजी शब्द आता आले, आपल्याकडे फार पूर्वीपासून आहेत, हा आपलेपणा ओळखायचा हे जीवनाचे एक कर्तव्य आहे ,आणि आपलेपणा ओळखून आपलेपणाने वागायचं हे दुसरं कर्तव्य आहे. आम्ही संघात असंच करतो, ही गोष्ट व्हायला पाहिजे. चार स्वयंसेवक विचार करतात विचार करायला सुरुवात करतात ही सगळी कामं उभी राहिलेली आहेत, ही काम संघाच्या बैठकीत ठरवून उभी राहिलेली नाहीत, ज्या ज्या वेळेला स्वयंसेवकांना जाणवलं त्या त्या वेळेला त्यांनी काम सुरू केलं. जे दीर्घकालीन काम आहे, हे चालू शकतं त्यांना मदतीची आवश्यकता आहे, मग संघटना त्यासाठी मदत करते, असं यावेळी मोहन भागवत यांनी म्हटलं आहे.

# सर्वसामान्य नागरीकांना सुविधा पुरविण्यासाठी नगर परिषदेने तत्पर रहावे–अमरसिंह पंडित

गेवराई, दि. २७ (प्रतिनिधी) नगरपरिषदे सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी काम करत असते नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत तसेच व्यापारी वर्गाला देखील सुविधा मिळाल्या पाहिजेत हाच हेतू ठेवून नगरपरिषद काम करत असते. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कसलेही राजकारण न करता सर्वसामान्यांच्या आणि व्यापारी वर्गाच्या सेवेसाठी तत्पर राहावे असे प्रतिपादन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. गेवराई नगर परिषदेच्या वतीने विविध विकासकामांचा शुभारंभ करताना ते बोलत होते. गेवराई शहरामध्ये नगर परिषदेच्या वतीने रुपये १ कोटी ५० लक्ष रुपये किंमतीच्या व्यापारी संकुल बांधकामाचा तसेच नविन बसस्थानक ते चार्वाक हॉटेल पर्यंत सिमेंट कॉक्रिट नाली बांधकामाचा शुभारंभ जयभवानी कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आला. यावेळी भवानी बँकेचे चअरमन बप्पासाहेब मोटे, माजी नगराध्यक्ष विनोद सौंदरमल, माजी उपनगराध्यक्ष शेख खाजाभाई, माजी नगरसेवक जालिंदर पिसाळ, राधेशाम येवले, कृष्णा मुळे, मंजुर बागवान, विलास सुतार, आवेज शरीफ, सय्यद नजीब, उत्तमराव सोलाने, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांड ेकर, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दिपक आतकरे, संजय पुरणपोळे, बंटी सौंदरमल, धमपाल भोले, ॲड. योगेश पाटील, ॲड. गौतम कांडेकर, ॲड. मनोज हजारे, दत्ता दाभाडे, संतोष आंधळे, मानवी हक्क अभियानचे कडुदास कांबळे, मोहसिन बागवान, सुभान शेख, सुभाष गुंजाळ, विलास ठाकुर, दत्ता लाड, संतोष सुतार, वसीम फारोकी, जे.के. बाबुभाई, अक्षय पवार, संदिप मडके, रजनी सुतार, बाबा शेख, राजाभाऊ जवंजाळ, कमलाकर हातागळे, दादासाहेब चौधरी, खालेद कुरेशी, सतिष दाभाडे, विलास निकम, सुनिल सुतार, शाम सुतार, नविद मशायक, सादेक शेख, बाळराजे सोनकांबळे, अन्सारी आदींसह राष्ट्रवादी कॉंग्र ेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. पूढे बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, गेवराई शहराचे अर्थकारण मजबुत करण्यासाठी शहराला जोडणारे रस्ते झाले पाहिजेत. गेवराई शहराच्या प्रत्येक भागाचा विकास झाला पाहिजे असेही ते यावेळी म्हणाले

# महिला आर्थिक विकास महामंडळाकडून लाडकी बहीण पतसंस्था सुरू होणार

बीड । प्रतिनिधी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात लाडकी बहीण पतसंस्था सुरू करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांकडू न ७०० रुपयांचे शेअर्स आणि १०० रुपये सभासद शुल्क घेण्यात येणार आहे. त्यानंतर त्या पतसंस्थेच्या सदस्य बनतील. सदस्य झाल्यानंतर त्या महिला आपली रक्कम सुरक्षितपणे जमा करून स्वतः च्या गरजेनुसार कर्जरूपाने खेळते भांडवल मिळवू शकतील. अनेक महिलांना बँकेत खाते काढणे, कर्ज मिळविणे अथवा व्यवसाय सुरू करताना आर्थिक नियोजन करणे कठीण जाते. त्यांच्यासाठी ङलाडकी बहीण पतसंस्थाफ एक विश्वासार्ह आणि सहजसोपे व्यासपीठ ठरणार आहे. या संस्थेच्या माध्यमातून महिलांना केवळ बचतच नव्हे, तर स्वावलंबनाची नवी दिशा मिळेल, असे महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप यांनी प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे. बीड जिल्ह्यात लाडकी बहीण पतसंस्था बाबत प्रक्रिया सुरू केली आहे. या पतसंस्थेत केवळ लाडकी बहीण योजनेतीलच नाही तर महिला आर्थिक विकास महामंडळ बचत गटातील विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता आणि दिव्यांग महिलांनाही सामावून घेतले जाणार आहे. महिलांची बचतीची सवय वाढावी व त्यांना व्यवसायासाठी त्वरित कर्ज कमी व्याजदरात उपलब्ध व्हावे यावर भर दिला जाणार असल्याचेही जगताप यांनी कळविले आहे.




बीडः येथे लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त युवाकिरण स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र पंचशील नगर, बीड. या ठिकाणी राजर्षी शाहू महाराजांची जयंती साजरी करण्यात आली या प्रसंगी महाराजांच्या प्रतिमेला पुष्प माला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अभिवादन करताना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे संचालक , ड.राहुल मस्के, परळी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी,मा.रणजीत शिंदे साहेब, मा.रमेश पडूळे, राहुल हजारे, विजय गायकवाड, दीपक कुचेकर ,श्रीराम बोराडे, प्रा.स्वप्निल मस्के आदींची उपस्थित होते.

# धाराशिव जिल्हा टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड

धाराशिव : धाराशिव जिल्ह्यातील सीए व कर सल्लागारांच्या असोसिएशनची महत्त्वपूर्ण बैठक २७ जून २०२५ रोजी पार पडली. या बैठकीमध्ये पुढील दोन वर्षांसाठीच्या नव्या पदाधिकाऱ्यांची निवड एकमताने व बिनविरोध करण्यात आली.यामध्ये अध्यक्षपदी सीए महेश मिनियार, उपाध्यक्षपदी कळंब येथील शिराज शेख, तसेच उमरगा येथील राहुल मोरे यांची सचिवपदी, तर कोषाध्यक्षपदी ऍडव्होकेट ललित चौधरी यांची निवड झाली आहे. कर सल्लागार अमोल अण्णाप्पा लोहार यांची सचिव म्हणून निवड करण्यात आली आहे.या बैठकीस जिल्ह्यातील अनेक ज्येष्ठ सीए, वरिष्ठ विधिज्ञ, कर सल्लागार मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडणुकीची प्रक्रिया पारदर्शक व शांततेत पार पडली.नवीन कार्यकारिणीने संघटनेला आणखी मजबूत करून कर सल्लागार व सीए व्यावसायिकांच्या हितासाठी नवे उपक्रम राबवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. धाराशिव जिल्ह्यातील कर प्रॅक्टिशनर्स असोसिएशनला नवे उंचावण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू, असा विश्वास नव्या कार्यकारिणीने व्यक्त केला.



# चौसाळा येथे छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर व महाराजस्व अभियान उत्साहात संपन्न

बीड प्रतिनिधी शुक्रवार 27 जून रोजी बीड तालुक्यातील चौसाळा येथे महाराष्ट्र शासनाच्या महाराजस्व अभियानांतर्गत बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या आदेशाने , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव तसेच बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान राबवण्यात आले . या कार्यक्रमाला मंडळ अधिकारी देविदास जायभाय , ग्राम महसूल अधिकारी शिवराम येवले , कमलेश निर्मळ , अश्विनी अनकर , निशा खांडेकर , शेख गफूर , यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले .या अभियानाअंतर्गत शेतकरी खातेदार यांना शेतकरी ओळखप्रमाणपत्र ( फार्मर आयडी ) चे महत्त्व समजावून सांगितले तसेच त्यांना ते काढून वितरीत करण्यात आले . जिवंत सातबारा मोहीम टप्पा-2 अंतर्गत या अभियानातून विविध योजना जसे की, वारस नोंदी , अपाक शेरा कमी करणे , एकुम नोंद कमी करणे , तगाई बोजा नोंद कमी करणे , कालबाह्य नोंदी कमी करणे , भोगवटादार वर्ग 1 व 2 नोंदी वेगळ्या करणे इत्यादी बाबत माहिती देण्यात आली .

संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ




योजनेंतर्गत सर्व लाभार्थींचे डी बी टी द्वारे मानधन वितरीत होणार आहे . यावेळी चौसाळा सर्कल अंतर्गत संपूर्ण गावातील उपस्थित लाभार्थी यांचे डी बी टी कामकाज करण्यात आले . यावेळी संगायो व श्रावण बाळ योजनेच्या 311 लाभार्थी यांचे डी बी टी करण्यात आले असे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी कळवले आहे .

यावेळी शेतकरी यांना रस्त्याचे महत्त्व समजावून सांगताना नकाशावरील रस्ते खुले करणे , त्याच्या नोंदी सातबारावर घेण्याकरीता ग्राम महसूल अधिकारी यांना शेतकरी यांनी मदत करणे , पी. एम किसान योजना , जन्म-मृत्यू दाखले , पुरवठा विभागाची कामे , फेरफार नोंदी बाबत अडचणीचे निराकरण करण्यात आले . मंडळ अधिकारी देविदास जायभाय यांनी चौसाळा सर्कल अंतर्गत उपस्थित ग्रामस्थाचे समाधान पूर्वक शंका निरसन करून मोलाचे मार्गदर्शन केले.

जिवंत सातबारा मोहीमेंतर्गत मृत शेतकरी खातेदाराच्या वारसांना शेतजमिनीशी संबधित योजनाचे फायदे सहज व वेगाने मिळावेत यासाठी “जिवंत सातबारा” मोहीम टप्पा-2 चे महत्त्व अगदी सोप्या भाषेत समजावून सांगण्यात आले . या शिबिरास चौसाळा गावाचे सरपंच बाबूशेट लोढा , उपसरपंच अंकुश कळासे , हिंगणी बु. चे उपसरपंच अंकुश गोरे , पालसिंगनचे सरपंच समाधान झांबरे हे उपस्थित होते .

या कार्यक्रमाच्या यशस्वी तेसाठी चौसाळा सर्कल मधील मंडळ अधिकारी तसेच सर्व ग्राम महसूल अधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले .

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com